**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:01.06.2025** **वार:रविवार**

---

आकाशवाणी पुणे, विजयालक्ष्मी साळवी प्रादेशिक बातम्या देत आहे....
ऑपरेशन सिंदूर भारतीय महिलांच्या शक्तिचं प्रतिक ठरल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त राज्यभरात अभिवादन
डीएपीचा तुटवडा असल्यानं पर्यायी खतांचा वापर करण्याचं कृषी विभागाचं आवाहन
देशाच्या पश्चिम घाटामधून दोन नवीन मिलिपीड अर्थात पैसा प्रजातींचा शास्त्रज्ञांकडून शोध आणि
आशियाई ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारत दुसऱ्या स्थानी

**पंतप्रधान**

पहलगाममधील दहशतवादी हल्ला हा भारताच्या महिला शक्तीला आव्हान होता आणि तो गुन्हेगारांसाठी मृत्युदंड ठरल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मध्य प्रदेशची राजधानी भोपाळ इथल्या जांबूरी मैदानात लोकमाता देवी अहिल्याबाई यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त आयोजित महिला सक्षमीकरण महासंमेलनाला संबोधित करताना ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूर ही भारताच्या इतिहासातील आतापर्यंतची सर्वात मोठी यशस्वी मोहीम असून भारत कोणत्याही प्रकारचं छुपं युद्ध सहन करणार नाही आणि अशा दहशतवादी कृत्यांना कडक प्रत्युत्तर देण्यासाठी देश कटिबद्ध आहे. असंही ते म्हणाले.
यावेळी सरकारच्या जनकल्याणकारी योजनांचा उल्लेख करताना, पंतप्रधानांनी लोकमाता देवी अहिल्याबाई होळकर यांच्या आदर्शांवर आधारित असलेल्या जनकल्याणकारी योजनांवर प्रकाश टाकला. प्रशासनात सरकार "नागरिक देवो भव" या मंत्राचं पालन करत असल्याचा तसंच महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाला राष्ट्रीय प्रगतीचा पाया बनवल्याचा उल्लेख त्यांनी केला.
आज सरकार का प्रयास है कि आधुनिक टेक्नॉलॉजी में भी हमारी बहनें, हमारी बेटियां आगे बढ़कर के नेतृत्व दें। अब जैसे आज खेती में ड्रोन क्रांति आ रही है। इसको हमारी गांव की बहनें ही नेतृत्व दे रही हैं आज बहुत बड़ी संख्या में हमारी बेटियां वैज्ञानिक बन रही हैं, डॉक्टर-इंजीनियर और पायलट बन रही हैं आज जितने भी हमारे बड़े स्पेस मिशन हैं, उनमें बड़ी संख्या में वैज्ञानिक के नाते हमारी माताएं-बहनें-बेटियां काम कर रही हैं।

लोकमाता देवी अहिल्याबाई होळकर यांना आदरांजली वाहताना, पंतप्रधान मोदी यांनी, देश वसाहतवादी राजवटीखाली असताना शिक्षण आणि सार्वजनिक कल्याणातील त्यांच्या अपवादात्मक नेतृत्वाची आणि योगदानाची प्रशंसा केली.
या कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधानांनी विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचं उद्घाटन केलं. याचवेळी देवी अहिल्याबाई होळकर यांच्या वारशाचा सन्मान करण्यासाठी, एक स्मारक टपाल तिकिट आणि 300

रुपयांच्या नाण्याचं अनावरणही करण्यात आलं. संस्कृती विभागानं आयोजित केलेल्या सुशासन, महिला सक्षमीकरण आणि लोकमाता अहिल्याबाईंशी संबंधित सांस्कृतिक वारशासाठी समर्पित प्रदर्शनालाही त्यांनी भेट दिली.

**मुख्यमंत्री**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंती निमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन इथं अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातल्या चौंडी इथं पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास भेट देऊन अभिवादन केलं. यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे आणि इतर मंत्रीगण उपस्थित होते. अहिल्यादेवींचं कार्य प्रेरणादायी असल्याचं यावेळी सांगताना मुख्यमंत्री म्हणाले...

अहिल्यामतांच्या जीवनावर बहुभाषिक कमर्शियल चित्रपट आपण तयार करणार आहोत. जो सगळ्या भाषांमध्ये आपण त्याठिकाणी तयार करणार आहोत जेणेकरून केवळ महाराष्ट्रात मध्यभारतात नव्हे तर संपूर्ण भारतामध्ये अगदी दक्षिणेपासून उत्तरेकडे पश्चिमेपासून पूर्वेकडे अहिल्यामातांच कर्तृत्व,कार्य,चरित्र आणि या देशावरचे आणि समजवरचे त्यांचे उपकार हे शेवटच्या माणसांपर्यंत पोहोचले पाहिजे हा आपला निश्चितपणे याठिकाणी प्रयत्न आहे. मी आज यानिमित्ताने आपल्याला सांगतो की अहिल्यामातांकडून आपण प्रेरणा घेऊन याठिकाणी काम करतो.

देशाची राजधानी दिल्लीसहित राज्यात नवी मुंबई, सांगली, पुणे, परभणी,नांदेडसह इतर जिल्ह्यातही अहिल्यादेवींची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. पुण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सरस्वती सभागृहात अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

मिरज इथं प्रसिद्ध रांगोळीकार आदमआली मुजावर यांनी 80 गुणिले 60 फूट आकारात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची रांगोळी रेखाटली आहे.

अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती दिनानिमित्त मुंबईत आरे कॉलनी इथं खासदार रविंद्र वायकर यांच्या संकल्पनेतून 'एक झाड शहिदांच्या नावे' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियान राबवण्यात आलं.

विकसित कृषी संकल्प अभियानाअंतर्गत, वैज्ञानिक आणि कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खरीप हंगामातील सोयाबीन, तूर, हळद, संत्रा या पिकांबाबत सविस्तर मार्गदर्शन केलं. यावेळी पुण्याजवळील नारायणगावचे शेतकरी राहुल घाडगे यांनी या उपक्रमाबाबत आकाशवाणीशी बोलताना सकारात्मक प्रतिक्रिया दिली.

आमच्या गावामध्ये नारायणगाव येथील कृषि विद्यापीठातील विविध विभागांचे शास्त्रज्ञ आले होते आणि त्यांनी आम्हाला माती परीक्षण, बीज प्रक्रिया, त्याचबरोबर एकात्मिक कीड नियंत्रण,खरीपातील यांचा जे महत्वाचा पीक आहे सोयाबीन या पिकानविषयी इथंभूत माहिती दिली. आणि त्याचा परिणाम म्हणजे येत्या

हंगामामद्धे जो काही आमचा उत्पादनावर होणारा खर्च आहे तो कमीत कमी कसा होईल याविषयी त्यांनी आम्हाला माहिती दिली. आम्ही अनेक प्रश्न त्यांना विचारले आणि या प्रत्येक प्रश्नाचं निराकरण या शास्त्रज्ञांनी आम्हाला केलं. ज्यावेळेस पीक काढणीला येतं आणि अनेकडका वेगवेगळ्या किडीनमुळे आमचं नुकसान होतं. त्यासाठी एकटमिक कीड नियंत्रण पद्धती आम्हाला समजावून सांगितल्या. मी एक शेतकरी म्हणून या अभियानाचा खूप अभिमान वाटतो की केंद्र शासनान हे अभियान सुरू केलं त्याच्या माध्यमातून सर्व शास्त्रज्ञ यांच्या बंधावर्ति आले आणि आम्हाला त्याचा फायदा झाला.

**<u>डीएपी</u>**

राज्यासाठी डाय-अमोनियम फॉस्फेट खताचा मागणीच्या तुलनेत अनेक जिल्ह्यांमध्ये तुटवडा असल्यानं शेतकऱ्यांनी डीएपीला बाजारात पर्यायी असलेली खतं वापरावीत असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे. डीएपीऐवजी युरिया अर्धी गोणी आणि एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डीएपीला चांगला पर्याय आहे. एसएसपीसोबत संयुक्त खतांचाही वापर करावा असं आवाहन पुणे कृषी संचालक सुनील बोरकर यांनी केलं आहे.

**<u>एफआयईओ</u>**

देशाच्या अर्थव्यवस्थेचा आलेख जागतिक पातळीवर सातत्यानं उंचावत असून भारतीय व्यावसायिकांना निर्यातीच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढत आहेत, असं प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य मंत्रालया अंतर्गत 'एफआयईओ' अर्थात फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशनचे महासंचालक डॉक्टर अजय सहाय यांनी केलं.

'एफआयईओ', मिटकॉन पुणे आणि कॅनरा बँक यांच्या वतीनं पुण्यात आयोजित निर्यात परिषदेत डॉक्टर सहाय यांनी वाढतं निर्यात अर्थकारण, ई-कॉमर्स क्षेत्रातील निर्यात, निर्यात क्षेत्रातील जोखीम तसंच निर्यातीच्या संधी, योजना अशा मुद्यांवर विवेचन केलं.

**<u>मिलिपीड</u>**

देशाच्या पश्चिम घाटामधून पॉलिड्रेपॅनम वंशामधील दोन नवीन मिलिपीड अर्थात पैसा प्रजातींचा शोध लागला असून, याची माहिती न्यूझीलंडमध्ये प्रकाशित होणाऱ्या झूटाक्सा या वैज्ञानिक नियतकालिकात प्रकाशित करण्यात आली आहे. या दोन्ही प्रजाती महाराष्ट्र आणि केरळ राज्यातील पश्चिम घाटात आढळलेल्या आहेत. या दोन नवीन प्रजातींच्या समावेशामुळं पॉलिड्रेपॅनम वंशातील अस्तित्वात असलेल्या प्रजातींची संख्या 6 झाली आहे. या प्रजातींचा शोध लावण्यात भारतीय प्राणी सर्वेक्षण, पश्चिम प्रादेशिक केंद्र पुणे येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर अपर्णा कलावटे, केरळमधील क्राइस्ट महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागाचे प्रमुख डॉक्टर सुधीरकुमार तसंच संशोधक विद्यार्थीनी मोहसीना मुस्तफा आणि कोल्हापुरच्या शिवाजी विद्यापीठातील संशोधक विद्यार्थीनी पूजा मिसाळ यांचा सहभाग आहे. पैसा या कीटकसदृश प्राण्याची, अन्न साखळीत महत्त्वाची भूमिका असून ते मृत वनस्पतींचे विघटन करून मातीच्या पोषणमूल्यांमध्ये वाढ करतात.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएलच्या दुसऱ्या पात्रता सामन्यामध्ये पाच वेळा विजेता मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात आज अहमदाबाद इथं सामना होणार आहे. या सामन्यातील विजेता मंगळवारी त्याच ठिकाणी अंतिम फेरीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसोबत भिडेल. पंजाबला प्रथमच विजेतेपद जिंकण्याची संधी आहे.

**<u>आशियाई-ॲथलेटिक्स</u>**

दक्षिण कोरियातील गुमी इथं झालेल्या आशियाई ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं 24 पदकांसह पदकतालिकेत दुसरं स्थान पटकावलं. भारतानं आठ सुवर्ण, 10 रौप्य आणि सहा कास्यपदकं जिंकली. अनिमेश कुजूर आणि पारुल चौधरी यांनी या स्पर्धेत नवे राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केले. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी काल भारतानं 3 रौप्य आणि 3 कास्यपदकं जिंकली. महिलांच्या 4 गुणिले 100 मीटर शर्यतीत, श्रावणी नंदा, अभिनया राजराजन, स्नेहा एसएस आणि नित्या गंधे यांच्या भारतीय संघानं रौप्यपदक जिंकलं. महिलांच्या 5000 मीटर अंतिम फेरीत, पारुल चौधरीनं रौप्यपदक जिंकलं, तर सचिन यादवनं पुरुषांच्या भालाफेकीत रौप्यपदक जिंकलं. पूजानं महिलांच्या 800 मीटर अंतिम फेरीत, तर अनिमेश कुजूरनं 200 मीटर स्पर्धेत आणि विद्या रामराजनं 400 मीटर अडथळा स्पर्धेत कास्यपदक जिंकलं.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.